MHCO170000192025

दाखल ता. २१/०१/२०२५
निकाल ता. ०५/०८/२०२६
कालावधी ०१ वर्षे ०६ महिने १५ दिवस

सहकारी न्यायालय कोपरगांव जिल्हा. अहमदनगर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी आर. एन. दांडगे)

ल. मु. नं. १८/२०२५ नि. ५७

यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित जिल्हा
अहमदनगर, या नावाने धंदा करणारी सहकारी
कायद्यान्वये नोंदलेली सहकारी संस्था हिचा
नोंणी र. नंबर ए. एन आर/ आर.एस.आर/
(सी.आर) १८५ दि. २०/०७/१९९२ मुख्य
कार्यालय श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर जि.
अहमदनगर शाखा संगमनेर, ता. संमगनेर जि.अहमदनगर .... **वादी**

विरुध्द

१) **दिलीप रामनाथ पुंड** मयत वारस
१अ) मनिषा दिलीप पुंड, वय:४७ वर्षे, धंदा: व्यापार
१ब) कार्तिक दिलीप पुंड, वय:अज्ञान वर्षे, धंदा: व्यापार
१क) अवधुत दिलीप पुंड, वय:अज्ञान वर्षे, धंदा: व्यापार
१ड) कृष्णा दिलीप पुंड, वय: अज्ञान वर्षे, धंदा: व्यापार
प्रतिवादी क्र. १ब ते १ड अज्ञान करीता पालनकर्ती
आई प्रतिवादी क्र.१ मनिषा दिलीप पुंड
रा. शिवाजी रोड, माळीवाडा, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर

२) **संपत गोविंद काळे**
वय: ५७, धंदा: नोकरी
रा. कासारवाडी रोड, घोडेकरमळा, संगमनेर,
ता. संगमनेर जि. अहमदनगर.

३) संतोष दत्तात्रय शहारे

वय:४१, धंदा: पानस्टॉल
रा. आयोध्या नगर, मालदाड रोड, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर .... **प्रतिवादी**

विवाद : रक्कम रुपये ४६,६३६.९७/– वसुलीसाठी.

वादीतर्फे वकील : ॲड. श्री. एस. जी. गेठे
प्र.वादी नं .१ ते २ : एकतर्फा.
प्र.वादी क्र.३ : ॲड. श्री. जी. आर. मेंद्रे

न्यायनिर्णय

(दिनांक ०५/०८/२०२६ रोजी घोषित करण्यात आला)

प्रस्तुत दावा कर्जाची थकबाकी त्यावरील व्याज व खर्च वसूल होऊन मिळण्यासाठी आहे.

वादातील थोडक्यात कथन :–

१. वादी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि नियमांनुसार नोंदणीकृत असलेली सहकारी पतसंस्था असून, तिचा व्यवसाय ठेवी स्वीकारणे आणि आपल्या गरजू सभासदांना कर्ज देणे हा आहे. असे नमूद केले आहे की, संचालक मंडळ सभेतील ठरावानुसार शाखा व्यवस्थापक श्री स्वप्निल छाबुराव भांड यांना प्रस्तुत दाव्यावर सही करून तो दाखल करण्याचा अधिकार दिलेला आहे.

२. पुढे असे नमूद आहे की, प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. ०१ ने प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांची वैयक्तिक जामीनकी देऊन, दिनांक ११/०३/२०१९ रोजी वादी संस्थेकडून रु. ४५,०००/– फिक्स कर्ज घेतले. या कर्जासाठी प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेच्या हक्कात कर्जाची कागदपत्रे, म्हणजेच वचनचिठ्ठी, कर्जरोखा इत्यादी, करुन दिली व दिनांक ११/०३/२०२३ पर्यंत १६% व्याजासह कर्जाची परतफेड करण्याचे मान्य केले.

३. असे नमूद आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने कर्जाची रक्कम घेतल्यानंतर अटी व शर्तीनुसार कर्जाची परतफेड केली नाही आणि कर्ज खाते थकित केले. असे नमूद आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ च्या नावे कर्जखाते ठेवले आहे व त्या कर्ज खात्यात जमा

रकमांचा आणि व्याजाचा नोंदी घेतल्या आहे. पुढे असे नमूद आहे की, या कर्ज खात्यानुसार दिनांक ३०/१२/२०२४ अखेर ४६,६३६.९७ रुपये देय आहेत.

४. पुढे असे नमूद केले आहे की, वादी संस्थेने प्रतिवादींना कर्जाची थकबाकी परतफेड करण्याची विनंती केली, परंतु प्रतिवादींनी कर्जाची थकबाकी परतफेड करण्यास टाळाटाळ केली. असे नमूद केले आहे की, वादी संस्थेने दिनांक २६/०६/२०२४ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठवुन प्रतिवादींना थकबाकी भरण्याची विनंती केली, तथापि, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी रक्कम भरली नाही, त्यामुळे वादी संस्थेला हा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

५. प्रतिवादींना दाव्याचे समन्स काढण्यात आले. समन्स बजावणी अनुषंगाने प्रतिवादी क्र. ०३ वकिलामार्फत हजर झाले व त्यांनी निशानी–३४ वर आपली कैफियत दाखल केली. प्रतिवादी क्र. १अ ते १ड व प्रतिवादी क्र. ०२ हे निशानी–१२ ते १६ अन्वये समन्स बजावूनही दाव्यात हजर झाले नाहीत, म्हणून दिनांक ०१/०७/२०२५ रोजी त्यांच्याविरुद्ध एकतर्फी आदेश पारीत करण्यात.

६. प्रतिवादी क्र. ०३ यांनी त्याच्या कैफियतीद्वारे असे कथन केले आहे की, वादी याचा दावा खोटा व बेकायदेशीर आहे. दावा दाखल करण्यासाठी कोणतेही कारण घडले नाही. प्रस्तुत दावा चालविण्याचा या न्यायालयाला अधिकारक्षेत्र नाही. दावा कायद्याच्या चौकटीत नाही. आवश्यक पक्षकारांचा समावेश न केल्यामुळे दावा सदोष आहे. दाव्यासाठी योग्य न्यायालयीन शुल्क भरलेले नाही. दावा मुदतीत नाही.

७. पुढे असे कथन केले आहे की, हे प्रतिवादी वादी संस्थेचे सभासद नाही व त्याचा प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जाशी कोणताही संबंध नाही.

८. पुढे असे कथन आहे की, त्याने वादी संस्थेच्या हक्कात प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जासाठी जामीनदार म्हणून कोणत्याही दस्तऐवजावर सही अथवा लिहुन दिला नाही. तेव्हा त्याचे असे कथन आहे की, दाखल केलेली कर्जाची कागदपत्रे खोटी आहेत.

९. पुढे, हे प्रतिवादी दावा परिच्छेद ०१ ते ०८ मधील कथने खोटे व चुकीचे असल्याचे आरोप करीत आहे, म्हणुन हे प्रतिवादी कर्ज परतफेड करण्यास जबाबदार असल्याचे नाकारत आहे.

१०. पुढे हे प्रतिवादी क्र. ०३ अतिरिक्त कथने म्हणून असे नमूद करीत आहे की, त्याने ११/०३/२०१९ रोजी कोणत्याही कर्ज दस्तऐवजांवर सही केली नाही व तो प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जास जामीनदार राहिला नाही. पुढे असे कथन आहे की, त्याने वादी संस्थेकडून कोणतेही कर्ज घेतले नाही. वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ कडुन कर्जासाठी कोणतेही गहाण घेतले नाही.

११. पुढे असे नमूद केले आहे की, तो वादी संस्थेचा सभासद नाही. तसेच, प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्ज व्यवहाराशी त्याचा कोणताही संबंध नाही. त्याने कोणतेही जामीनरोखा अथवा संमतीपत्र करुन दिले नाही किंवा प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाची जबाबदारी स्वीकारलेली नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, कर्जदाराचा मृत्यू झाला असून, थकबाकी मृत कर्जदाराच्या वारसांकडून आणि त्याच्या मालमत्तेतून वसूल करण्यात यावी. असे नमूद केले आहे की, खोट्या कागदपत्रांच्या आधारे त्याला जामीनदार क्र. ०२ म्हणून दाखवण्यात आले आहे आणि त्याच्याकडून बेकायदेशीर वसुली करण्याचा प्रयत्न करत आहे. तेव्हा असे म्हणणे आहे की, थकबाकी मृत कर्जदाराच्या वारसांकडून म्हणजेच प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांच्याकडून वसूल करण्यात यावी आणि त्याच्याविरुद्ध दावा फेटाळण्यात यावा.

१२. या परस्परविरोधी कथनाच्या अनुषंगाने, मी निशानी–३५ वर येथे मुद्दे गठीत केले आहे. पुढे सदर मुद्दयांना मी माझे कारणमिमांसा देऊन खालील प्रमाणे उत्तर देत आहे.

अनु. क्र.	मुद्दे	कारणमिमांसा
१.	प्रतिवादी क्र.३ वादी संस्थेचा सभासद आहे व प्रस्तुतचा दावा म. स. का. कलम ९१ प्रमाणे या न्यायालयास चालविण्याचा अधिकार क्षेत्र आहे असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
२.	प्रतिवादी क्र.३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीन राहिले आहेत व त्यासंबंधी त्यांनी वादी संस्थेच्या हक्कात कर्जकागदपत्र करुन दिली असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
३.	येणे रक्कम देण्यास प्रतिवादी क्र.३ जबाबदार नाही व सदर येणे रक्कम प्रतिवादी क्र.१अ ते १ड कडुन वसुल करुन द्यावी असे प्रतिवादी क्र.३ सिध्द करतात का ?	नकारार्थी

४.	प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडून दाव्यात मागणी केलेली येणे रक्कम रु. ४६,६३६.९७ पैसे पुढील व्याज १६% प्रमाणे वैयक्तिक व सुयंक्तिरित्या वसुल करण्यास वादी पात्र आहे असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
५.	काय आदेश व निवाडा	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणे

१३. वादी संस्थेने आपला दावा सिद्ध करण्यासाठी, तिचे अधिकृत इसम श्री. स्वप्निल छब्बुराव भांड यांची प्रतिज्ञापत्राद्वारे साक्ष नोंदवली आहे. या साक्षीदाराने निशानी–३७ ते ५५ वर कागदोपत्री पुरावे दाखल करुन त्यावर अवलंबून राहिले आहे. वादी संस्थेने निशानी–५६ ची पुरशिस देऊन पुरावा समाप्त केला आहे. पुढे, प्रतिवादी क्र. ०३ यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केला नाही. वादी संस्थेसाठी विद्वान वकील श्री. एस. जी. गेठे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ०३ आणि त्यांचे विद्वान वकील युक्तिवादासाठी अनुपस्थित राहिले. त्यामुळे, दाव्यात आलेला तोंडी आणि कागदोपत्री पुराव्यांची छाननी करून, मी मुद्दयांना खालीलप्रमाणे उत्तरे दिली आहेत;

मुद्दा क्र. १ बाबत :–

१४. प्रतिवादी क्रमांक ३ चा असा दावा आणि आरोप आहे की, तो वादी संस्थेचा सभासद नाही, त्यामुळे या न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार नाही.

१५. वादीच्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केल्यास त्याने प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत असे म्हटले आहे. दाव्याचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, मृत प्रतिवादी क्रमांक ०१ हा कर्जदार आहे. प्रतिवादी क्रमांक १अ ते १ड हे मृत प्रतिवादी क्रमांक ०१ चे कायदेशीर वारस असल्याने त्यांना दाव्यात पक्षकार करण्यात आले आहे. पुढे असा पुरावा आहे की, प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांच्या वैयक्तिक जामीनकीवर मृत प्रतिवादी क्रमांक ०१ ने वादी संस्थेकडून कर्ज घेतले होते आणि या मृत प्रतिवादी क्रमांक ०१ ने प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ सोबत मिळून सदर कर्जासाठी वादी संस्थेच्या हक्कात कर्जकागदपत्रे लिहुन दिली आहे.

१६. पुराव्याची पुढे तपासणी केली असता असे दिसून येत आहे की, मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी वादी संस्थेचे सभासद होण्यासाठी अर्ज दाखल

केले आहेत. पुढे असा पुरावा आहे की, या प्रतिवादींना सभासद म्हणून करुन घेण्यात आले आहे आणि सदर सभासद अर्जांवर या प्रतिवादींना सभासद करुन घेतल्याचा शेरा आहे व त्या शेरा वर मॅनेजरची सही आहे. अशाप्रकारे, वादीच्या साक्षीदाराचा हा पुरावा आहे की, मृत प्रतिवादी क्र. ०१ हे अ वर्ग सभासद होता आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हे वादी संस्थेचे नाममात्र सभासद आहेत या करीता वादी साक्षीदार निशाणी ५३ ते ५५ या कागदपत्रांवर अवलंबून राहिले आहे.

१७. या कागदपत्रांची छाननी केल्यावर असे दिसून येते की, निशानी–५३ हा मृत प्रतिवादी क्र. ०१ यांचा वादी संस्थेचे सभासद होण्यासाठी केलेला अर्ज आहे. या अर्जावरून असे दिसून येते की, मृत प्रतिवादी क्र. ०१ यांनी सभासद होण्यासाठी रु. ४,५००/– भरून वादी संस्थेचे ४५ शेअर्स खरेदी केले आहे. पुढे असेही दिसून येते की, या मृत प्रतिवादी क्र. ०१ यांनी सभासद प्रवेश फी रु. १०/– भरली आहे. पुढे, या अर्जावर दिनांक २४/०२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील ठराव क्र. ०३ नुसार या मृत प्रतिवादी क्र. ०१ यांना सभासद करुन घेतल्याची नोंद आहे. या नोंदीवर अध्यक्ष आणि व्यवस्थापक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

१८. पुढे, निशानी–५४ आणि ५५ चे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, हे प्रतिवादी क्रमांक ०२ आणि ०३ यांनी वादी संस्थेचे नाममात्र सभासद होण्यासाठीचे अर्ज आहेत. या अर्जांवर प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांची माहिती असून, त्यावर प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या अर्जांच्या शेवटी व्यवस्थापन समितीच्या बैठकीतील ठराव क्रमांक ०५ द्वारे या प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांना नाममात्र सभासद करुन घेतल्याची नोंद आहे. प्रतिवादींना नाममात्र सभासद म्हणून करुन घेतल्याचा या नोंदीवर अध्यक्ष आणि व्यवस्थापक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. हा तोंडी आणि लेखी पुरावा प्रतिवादी क्रमांक ०३ ने खोडून काढलेला नाही किंवा त्याचे खंडन केलेले नाही. प्रतिवादी क्रमांक ०३ ने आपल्या कैफियतमध्ये वादी संस्थेचे सभासद असल्याचे नाकारले आहे. तेव्हा प्रतिवादी क्रमांक ०३ यांनी वादीच्या साक्षीदाराचा पुरावा खोडून काढण्याची व ते सभासद नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी होती. प्रतिवादी क्रमांक ०३ हे सिद्ध करु शकले नाहीत. निशानी–५५ च्या कागदोपत्री पुराव्यावरून असे दिसून येते की,

व्यवस्थापन समितीच्या २४/०२/२०१९ रोजीच्या बैठकीत ठराव क्रमांक ०५ अन्वये प्रतिवादी क्रमांक ०३ यांना वादी संस्थेचे नाममात्र सभासद करुन घेण्यात आले आहे. तेव्हा या तोंडी व लेखी पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, वादीने प्रतिवादी क्रमांक ०३ हे वादी संस्थेचे नाममात्र सभासद आहेत हे सिध्द केले आहे.

१९. आता वादीने हे मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहे असे सिध्द केले आहे. दाव्याच्या कथनाचा पुढील अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, हा दावा एका नोंदणीकृत सहकारी पतसंस्थेने तिच्या सभासदाकडून कर्जाची थकबाकी वसूल करण्यासाठी दाखल केला आहे. महाराष्ट सहकरी संस्था कायद्याचा कलम ९१ च्या तरतुदींनुसार, सहकारी संस्थेच्या व्यवसायाशी निगडीत असलेला व तिच्या सभासदाविरुद्ध दाखल केलेला दावा सहकारी न्यायालयाकडे दाखल केला जाऊ शकतो. प्रस्तुत दाव्याचा विषय आणि दाव्यातील पक्षकारांचा विचार करता, वादी ही एक सहकारी संस्था आहे आणि प्रतिवादी तिचे सभासद आहेत. त्यामुळे, या दोन्ही बाबी प्रस्तुत दावा म. स. का. कलम ९१ च्या कक्षेत येत आहे. जेव्हा हा दावा म. स. का. कायद्याच्या कलम ९१ च्या कक्षेत येत आहे, तेव्हा निश्चितपणे या न्यायालयाला प्रस्तुत दाव्याची चालविण्याचा अधिकार आहे. या सर्व बाबी करुन मी या निष्कर्षास येत आहे की, वादी यांनी प्रतिवादी क्र. ०३ हे वादी संस्थेचा सभासद असल्याचा व प्रस्तुत दावा म. स. का. च्या कलम ९१ च्या कक्षेत येत असल्याचे सिध्द केले आहे. तेव्हा या न्यायालयास प्रस्तुत दावा चालविण्याचा अधिकार आहे. तेव्हा या कारणमिमांसा वरुन माझे या मुद्यास उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र. ०२ :–</u>

२०. प्रतिवादी क्र. ०३ ने त्याच्या कैफियतद्वारे मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाशी संबंध नाकारला आहे. त्याचा दावा आणि आरोप असा आहे की, तो मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिला नाही, तसेच त्याने मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाची जबाबदारी स्वीकारून कोणत्याही कर्ज दस्तऐवजावर सही केली नाही.

२१. या संदर्भात मी वादीच्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याची छाननी केली आहे. या तोंडी पुराव्याच्या अवलोकनातून असे दिसून आले आहे की, वादी ही एक सहकारी

पतसंस्था असून, तिचा व्यवसाय ठेवी स्वीकारणे आणि तिच्या गरजू सभासदांना कर्ज देणे हा आहे.

२२. पुढे असा पुरावा आहे की, मृत प्रतिवादी क्र. ०१ ने प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांची वैयक्तिक जामीनकी देऊन वादी संस्थेकडे कर्जासाठी विनंती केली होती. वादी संस्थेने मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्ज अर्जाचा विचार करून मृत प्रतिवादी क्र. ०१ ला रु. ४५,०००/– चे फिक्स लोन कर्ज मंजूर केले. पुढे असा पुरावा आहे की, या मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी दिनांक ११/०३/२०१९ रोजी सदर कर्जासाठी वादी संस्थेच्या हक्कात वचनचिठ्ठी, कर्जरोखा, जामीननामा इत्यादी दस्तऐवज करुन दिली आणि प्रतिवादी क्र. ०१ ला कर्जाची रक्कम वितरित केली. परंतु प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांनी जामीननामा लिहुन देऊन जामीनदार म्हणून कर्जाची जबाबदारी स्वीकारली आहे.

२३. पुढे असा पुरावा आहे की, या प्रतिवादींनी कर्जाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करून दि. ११/०३/२०२३ पर्यंत १६% व्याजासह कर्ज परतफेड करण्यास सहमती दर्शवली होती. पुढे असा पुरावा आहे की, मृत प्रतिवादी क्र. ०१ ने कर्जाच्या अटी व शर्तींनुसार कर्जाची परतफेड केली नाही आणि कर्ज खाते थकित केले.

२४. वादी साक्षीदाराने त्याच्या तोंडी पुराव्याच्या समर्थनार्थ निशानी–३८ ते ४३ चा दस्तऐवजी पुरावे सादर केले आणि त्यावर अवलंबून राहिले. या दस्तऐवजी पुराव्यांची छाननी केल्यावर असे दिसून येते की, निशानी–३८ हा मृत प्रतिवादी क्र. ०१ यांचा कर्ज अर्ज आहे. या कर्ज अर्जात प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांची नावे जामीनदार म्हणून दर्शविली आहेत. या कर्ज अर्जावर मृत प्रतिवादी क्र. ०१ यांची स्वाक्षरी असून, त्यावरून असे दिसून येते की, त्यांनी वादी संस्थेकडे रु. ४५,०००/– च्या कर्जासाठी मागणी केली आहे. या कर्ज अर्जाच्या पान–२ वर जामीनदार क्र. ०१ आणि ०२ यांची माहिती आहे, जे प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ आहेत. या अर्जावर त्यांच्या स्वाक्षऱ्याही आहेत. पुढे असे दिसून येते की, दिनांक २४/०२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीत या अर्जावर विचार करुन ठराव क्र. ०६ ने मृत प्रतिवादी क्र. ०१ यांना रु. ४५,०००/– चे कर्ज मंजूर करण्यात आले. या मंजुरीच्या शेरावर वादी संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापक

यांची स्वाक्षरी आहे. पुढे, निशानी–३९ मध्ये मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी केलेला करारनामा आहे. या कर्ज करारावर मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांच्या सह्या आहेत. या कर्ज करारातून हे देखील उघड होते की, मृत प्रतिवादी क्र. ०१ यांना रु. ४५,०००/– चे कर्ज वितरित करण्यात आले होते आणि सदर कर्जाची परतफेड १६% प्रतिवर्ष व्याजासह ४८ मासिक हप्त्यांमध्ये करायची होती. पुढे निशानी–४० चे अवलोकन केल्यास, तो मृत प्रतिवादी क्र. ०१ यांनी केलेला कर्जरोखा आहे. निशानी–४१ हे प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी करुन दिलेले जामीननामा आहे. या जामीनामा वर प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांच्या सह्या आहेत. पुढे, निशानी–४२ हे सातत्य पत्र आहे आणि निशानी–४३ हे मृत प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी केलेले वचनचिठ्ठी आहे.

२५. प्रतिवादी क्र. ०३ ने मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिल्याचे नाकारले आहे. तसेच, त्याने वादी संस्थेच्या हक्कात जामीनदार म्हणून कर्ज कागदपत्रे करुन दिल्याचे नाकारले आहे. तथापि, या प्रतिवादी क्र. ०३ ने वादी साक्षीदाराचा तोंडी व लेखी पुरावा खोडून काढला नाही किंवा त्याचे खंडन केले नाही. निशानी–३८ ते ४३ या लेखी पुराव्यांच्या अवलोकनातून असे दिसून येते की, या प्रतिवादी क्र. ०३ ने या कागदपत्रांवर स्वाक्षरी करून दिली आहेत. कर्ज अर्ज निशानी–३८ वर प्रतिवादी क्र. ०३ चे नाव जामीनदार क्र. ०२ म्हणून दिसते. तसेच, करारनामा निशानी–३९ वर देखील ते जामीनदार क्र. ०२ म्हणून दाखवले आहे. निशानी–४१ हे प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांनी करुन दिलेले जामीननामा आहे. या जामीननामा वरुन असे दिसून येते की, जामीनदारांनी मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाची जबाबदारी स्वीकारली होती. तसेच, सातत्य पत्र आणि वचनचिठ्ठीवर या प्रतिवादी क्र. ०३ ने स्वाक्षरी केली आहे. तेव्हा, या कागदोपत्री पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. ०३ हा मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार होता आणि त्याने वादी संस्थेच्या हक्कात जामीनदार म्हणून निशाणी–३८ ते ४३ हे दस्तऐवज करुन दिली आहे. तेव्हा या तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून मी या निष्कर्षास येत आहे की, वादी यांनी प्रतिवादी क्र. ०३ हा मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिले आहे आणि त्याने मृत प्रतिवादी

क्र. ०१ व प्रतिवादी क्र. ०२ यांच्यासोबत निशाणी–३८ ते ४३ चे दस्तऐवज करुन दिली आहेत. या सर्व कारणावरुन माझे या मुद्दयास उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्रमांक ०३ व ०४ :–</u>

२६. वादी साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केल्यावर असे दिसून येत आहे की, मृत प्रतिवादी क्रमांक ०१ ने कर्ज घेतल्यानंतर कर्जाच्या अटी व शर्तीनुसार कर्जाची परतफेड करायची होती. तथापि, प्रतिवादी क्रमांक ०१ कर्जाची परतफेड अटी–शर्तीप्रमणे केली नाही. कर्ज खाते थकित केले. पुढे असा पुरावा आहे की वादी संस्थेने वकिलांमार्फत दिनांक २६/६/२०२४ रोजी नोटीस पाठविली, तथापि नोटीस देऊनही प्रतिवादींनी परतफेड केलेली नाही.

२७. पुढे असा पुरावा आहे की, वादी संस्थेने मृत प्रतिवादी क्र. ०१ चे कर्ज खाते ठेवले आहे आणि सदर कर्ज खात्यानुसार प्रतिवादींकडून रु. ४६,६३७/– येणे बाकी आहे. साक्षीदाराने निशानी–५१ वर कर्ज खात्याचा उतारा सादर केला होता.

२८. कागदोपत्री पुराव्यांच्या तपासणीतून असे दिसून येते की, वादी साक्षीदाराने वादी संस्थेच्या वकिलांमार्फत पाठविलेली नोटिसची प्रत निशाणी–४४ वर सादर केली आहे. या नोटीसच्या पोचपावती निशानी–४५ ते ४९ वर सादर केल्या आहेत. वादीने या नोटीसद्वारे प्रतिवादींना दिनांक १४/६/२०२४ अखेर रु. ४२,०११.८४ पैशांची थकबाकी भरण्याची विनंती केली आहे. असे दिसून येते की, या प्रतिवादींनी या नोटीसला कोणतेही उत्तर दिलेले नाही.

२९. निशानी–५१ च्या खाते उताराची तपासणीवरून असे दिसून येते की, दि. ११/०३/२०१९ रोजी कर्जाची रक्कम कर्ज खात्यात नावे टाकण्यात आली आहे. तसेच, तिमाही आकारण्यात येणाऱ्या व्याजाच्या नावे नोंदी घेतल्या आहेत. पुढे, प्रतिवादी क्र. ०१ ने केलेल्या परतफेडीच्या जमा नोंदी आहेत, तथापि सदर परतफेड नियमित केलेली दिसुन येत नाही. केवळ रु. ३६,४०९/– ची परतफेड केली असल्याचे दिसुन येते. कर्ज खात्यात दाखवलेली थकबाकी रु. ४६,६३६.९७ पैसे आहे. प्रतिवादी क्र. ०३ चा आरोप आहे की, प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्ज व्यवहाराशी त्याचा कोणताही संबंध नाही. तो

प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिला नाही. वादी संस्थेने कर्जासाठी कोणतीही तारण घेतली नाही. त्याने मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीननामाचा दस्तऐवज करुन दिला नाही.

३०. शिवाय, असाही आरोप आहे की हे कर्ज मृत प्रतिवादी क्र. ०१ ने घेतले आहे. मृत प्रतिवादी क्र. ०१ चे वारस रेकॉर्डवर आहेत, त्यामुळे कर्जाची थकबाकी मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या वारसांकडून वसूल केली जावी आणि त्याला या थकबाकीसाठी जबाबदार धरू नये.

३१. खातेउतारा निशानी–५१ वरून असे दिसून येते की, दिनांक २/१/२०२५ रोजी कर्जाची थकबाकी रु. ४६,६३६.९७ आहे. खातेउताऱ्याली नोंदींना प्रतिवादींनी आव्हान दिलेले नाही किंवा त्या खोडुन काढलेल्या नाहीत. त्यामुळे खातेउतारा निशानी–५१ अबाधित आणि सिद्ध होत आहे व प्रतिवादींकडून रु. ४६,६३७/– ची थकबाकी असल्याचे दर्शवित आहे. यावरुन हे स्पष्ट होत आहे की, वादी संस्थेने त्यांची रक्कम रु. ४६,६३७/– ची मागणी सिद्ध केली आहे.

३२. आता प्रतिवादी क्र. ०३ असा दावा करत आहे की, त्याचा कर्जाशी कोणताही संबंध नाही, त्यामुळे त्याला थकबाकीसाठी जबाबदार धरू नये. तसेच असेही म्हटले आहे की थकबाकी मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या वारसांकडून वसूल करावी आणि त्याच्याविरुद्ध कोणताही आदेश पारित करू नये. या संदर्भात, मुद्दा क्र. ०२ च्या कारणांमध्ये मी आधीच असे मत मांडले की प्रतिवादी क्र. ०३ हा मृत प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जास जामीनदार आहे. प्रतिवादी क्र. ०३ हे प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाचे जामीनदार असल्याने, करार कायद्याच्या कलम १२८ च्या तरतुदींनुसार, जामीनदाराची जबाबदारी कर्जदारासोबत संयुक्त व वैयक्तिक असते. तेव्हा, प्रतिवादी क्र. ०३ हे कर्जास जामीनदार असल्याने, त्याची कर्जाप्रती असलेली जबाबदारी संयुक्त व वैयक्तिक आहे. तेव्हा प्रतिवादी क्र.०३ असे म्हणू शकत नाही की येणे रक्कम केवळ प्रतिवादी क्र. १अ ते १ड कडून वसूल करण्याचे निर्देश द्यावेत आणि त्याला जबाबदार धरू नये. या कारणास्वत माझे असे निष्कर्ष आहे की, वादी प्रतिवादीं क्र. ०१ ते ०३ कडून संयुक्तपणे व वैयक्तिरित्या येणे रक्कम १६% भविष्यातील व्याजासह वसूल करण्यास पात्र आहे, तेव्हा मुद्दा क्र. ०३ यास माझे उत्तर

नकारार्थी आहे व मुद्दा क्र. ०४ यास होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र. ०५ :–</u>

३३. मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ ला उपरोक्त प्रमाणे दिलेल्या कारणांच्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारित करत आहे;

आदेश

१) वादी यांचा दावा खर्चासहित मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेला रु. ४६,६३७/– संयुक्तपणे व वैयक्तिरित्या देण्याचे आहे. तसेच या रकमेवर दि. ०३/०१/२०२५ पासून पुढील व्याज १६% साध्या व्याज दराने संपुर्ण रक्कम फिटे पर्यंत देण्याचे आहे.

३) प्रतिवादींनी दाव्याचा खर्च देखील वादीला देण्याचा आहे.

४) येणेप्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

DANDGE RAJU NARAYAN

Digitally signed by DANDGE RAJU NARAYAN
Date: 2026.08.05 12:48:43 +0530

दिनांक : ०५/०८/२०२६
ठिकाण : कोपरगाव

आर. एन. दांडगे
न्यायाधीश
सहकारी न्यायालय, कोपरगाव